### दंगली पेटवून महाराष्ट्र अशांत करण्याचे भाजपाचे षडयंत्र !: नाना पटोले

# उत्तर प्रदेशसह पाच राज्यातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून दंगलीचे राजकारण

■ मुंबई

त्रिपुरात घडलेल्या घटनेचे पडसाद म्हणून महाराष्ट्र अमरावती, नांदेड, मालेगावसह काही भागात वातावरण पेटवण्याचा प्रयत्न केला जात आहे. उत्तर प्रदेशसह पाच राज्यात विधानसभेच्या निवडणुका लवकरच होत आहे. दंगली पेटवून निवडणुकीत त्याचा फायदा घेण्याचा भाजपाचा नेहमीप्रमाणे डाव आहे. म्हणूनच त्रिपुरा घटनेच्या आडून महाराष्ट्रात दंगली पेटवून त्यावर उत्तर प्रदेशात आपली राजकीय पोळी भाजण्याचे भारतीय जनता पक्षाचे षडयंत्र असून या षडयंत्राला राज्यातील जनतेने बळी पडू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये शांतता राखावी, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.

काल आणि आज अमरावतीसह काही भागात घडलेल्या हिंसक घटनांचा तीव्र निषेध करून नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांचे सरकार दोन वर्षापासून स्थिर असून भाजपाने हे सरकार अस्थिर करण्यासाठी खूप प्रयत्न केले पण यात त्यांना यश आले नाही.

महाराष्ट्रात अशांतता पसरवून सरकार पाडण्याचे सर्व प्रकारचे उद्योग झाले त्यात महागाई, बेरोजगारी, ढासळती अर्थव्यवस्था, चीनची घुसखोरी, शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून देशभर भारतीय जनता पक्षाच्याविरोधात तीव्र असंतोष आहे. या मुख्य मुद्यापासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भाजपाकडून असे षडयंत्र केले जात आहे. हिंसक कारवाया करणाऱ्यांवर व अफवा पसरवणाऱ्यांवर सरकारने कारवाई करावी.

समाजातील दोन घटकांमध्ये तेढ निर्माण करुन त्यावर आपली राजकीय पोळी भाजण्याचे राजकारण करणे हा भारतीय जनता पक्षाचा इतिहास राहिला आहे. देशातील ज्वलंत प्रश्नावर जनतेच्या आक्राशोला त्यांना तोंड देता येत नाही. तर जनतेमध्ये भाजपा व मोदी सरकारविरोधात प्रचंड असंतोष आहे. या असंतोषाचा फटका उत्तर प्रदेशसह पाच राज्यातील आगामी विधानसभेच्या निवडणुकीत बसू नये म्हणून दंगली पेटवून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा भाजपाचा डाव आहे. महाराष्ट्रातील जनतेने भारतीय जनता पक्षाचा हा कुटील हेतू ओळखून षडयंत्राला बळी पडू नये, राज्यात शांतता राखावी, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी केले आहे.

# महानगरपालिकेची 488 खुल्या ठिकाणी व्यायामाची उपकरणे उपलब्ध

■ मुंबई

मुंबई महानगरासारख्या अत्यंत घनदाट लोकसंख्येच्या, अरुंद वसाहतींच्या शहरात मधुमेह व तत्सम आजाराने ग्रस्त नागरिकांना व्यायाम, चालणे, धावणे यासारख्या आरोग्यदायी सेवा सुविधा मिळाव्यात म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने सुमारे ४८८ खुल्या ठिकाणी व्यायामाची साधने उपलब्ध करून दिली आहेत. बहुतांश उद्यानांमध्ये जॉगिंग ट्रॅक, पदपथ, योगा व ध्यानधारणा केंद्र यासारख्या सुविधा विनामूल्य उपलब्ध असल्याने मधुमेह ग्रस्त नागरिकांसाठी त्या जणू संजीवनीच ठरत आहेत.



दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस जगभरात जागतिक मधुमेह दिवस म्हणून साजरा केला जातो. मधुमेह हा दीर्घकालीन आजार असून तो बळावला तर आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. कोणत्याही विशिष्ट वयोगटापर्यंत सीमित न राहता हा आजार आता सर्व वयोगटात आढळतो. मधुमेहाची लक्षणे दिसू लागताच जागरूक होऊन आवश्यक ती काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य आहारासोबत नेटकी जीवनशैली व दिनचर्या तसेच दररोज चालणे, धावणे यासह वैद्यकीय तज्ज्ञांनी सुचवलेले व्यायाम करणे हे महत्त्वाचे ठरते.

सन २०२१-२०२३ ह्या कालावधीकरिता access to diabetes care अर्थात मधुमेह विषयक काळजीसाठी आवश्यक सेवा उपलब्ध होणे, ही संकल्पना जगभरात राबविण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून मधुमेह संदर्भात व्यापक जनजागृती करून मधुमेह ग्रस्त रुग्णांना निरनिराळ्या वैद्यकीय सेवा दिल्या जातातच. त्यासोबत उद्यान विभाग देखील यामध्ये महत्वाचे योगदान देत आहे.

सद्यस्थितीत उद्यान विभागाच्या अखत्यारित एकूण १ हजार ०६८ भूभाग आहेत. मागील चार ते पाच वर्षांपासून विविध उद्याने, मनोरंजन मैदाने आणि खेळांची मैदाने येथे खुली व्यायामाची उपकरणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आजपर्यंत सुमारे ४८८ ठिकाणी अशी उपकरणे लावण्यात आली आहेत. त्यात आणखी वाढ करण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) श्रीमती आश्विनी भिडे आणि उपायुक्त (उद्याने) श्री. रमाकांत बिरादार यांनी दिले आहेत.

# कंगणाच्या मेंदूला गंज आलाय, मेंटल कारागृहामध्ये टाका - महापौर किशोरी पेडणेकर

प्रतिनिधी

■ मुंबई

कंगना राणावत ही बनावट झाशीची राणी असून ती नेहमीच देशाची महाराष्ट्र आणि मुंबईची मान आणि शान घालवते. यामुळे तिच्यावर कारवाई झाली पाहिजे. कंगणाच्या मेंदूला गंज आलाय तिला मेंटल कारागृहामध्ये टाका अशी संतप्त प्रतिक्रिया मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी व्यक्त केली आहे.

अभिनेत्री कंगना राणावत आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेत असते. कंगनाने देशाला खरे स्वातंत्र्य 2014 ला मिळाल्याचे वक्तव्य केले आहे. याचे पडसाद सर्वत्र उमटले आहे. कंगणाला देण्यात आलेला पद्मश्री पुरस्कार परत घ्यावा अशी मागणी जोर धरत आहे. तिच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी ठिकठिकाणी करण्यात आली आहे. अनेक पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बोलताना कंगणाच्या मेंदूला गंज आलाय तिला मेंटल कारागृहामध्ये टाका अशी मागणी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केली आहे.

कंगना राणावत ही नटवी नटी आहे, तिच्यावर कोणतेही संस्कार झालेले दिसत नाहीत. प्लास्टिकच्या घोड्यावर बसून कोणी झाशीची राणी होत नाही. ही बनावट झाशीची राणी आहे. एक झाशीची राणी पिक्चर केला म्हणून पूर्ण भारत कळला असे होत नाही.

भारताला महाराष्ट्राला आणि मुंबईला इतक्या सहज स्वातंत्र्य मिळालेले नाही. अनेक जाती पंथांच्या लोकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. त्यानंतर स्वातंत्र्य मिळाले आहे. 107 हुतात्मे मुंबईने दिले आहेत असे महापौरांनी म्हटले आहे.

**कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे**

कंगनाने आपण ड्रग ऍडिट असल्याचे स्वत ; कबूल केले आहे. अशा ड्रग ऍडिटकडून आपण काय अपेक्षा ठेवायची. तिच्या मेंदूला गंज आलाय, त्यामुळे ती काहीही बरळत असते.तिला काही पक्ष पाठीशी घालतात. ती नेहमीच देशाची महाराष्ट्र आणि मुंबईची मान आणि शान घालवते. यामुळे तिच्यावर कारवाई केली पाहिजे. तिला मेंटल कारागृहामध्ये टाकले पाहिजे अशी मागणी महापौरांनी केली आहे. कंगना आम्हाला स्वातंत्र्यवीरांबदद्दल काय शिकवणार ? हे सर्व घृणास्पद आहे . तिच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी महापौरांनी केली आहे.

### महाज्योतीच्या माध्यमातून शिक्षणाच्या आधुनिकीकरणाला चालना मिळेल - पालकमंत्री छगन भुजबळ



■ नाशिक

आजच्या स्पर्धेच्या काळात ऑनलाईन शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या स्पर्धेच्या काळात इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेच्या वतीने मोफत टॅबचे वाटप करण्यात आले असून महाज्योतीच्या माध्यमातून आधुनिक प्रकारचे शिक्षण देण्यासाठी चालना मिळणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे महाज्योती संस्थेच्यावतीने मोफत टॅब वाटप कार्यक्रमात पालकमंत्री श्री. भुजबळ बोलत होते. यावेळी महाज्योती संस्थेचे संचालक प्रा. दिवाकर गमे, ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. कैलास कमोद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त भगवान वीर, सहायक आयुक्त सुंदरसिंग वसावे, बाळासाहेब कर्डक, दिलीप खैरे यांच्यासह महाज्योतीच्या वतीने ऑनलाईन प्रशिक्षण घेणारे जिल्ह्यातील विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री छगन भुजबळ म्हणाले, मागास प्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे, शिक्षणापासून कोणीही विद्यार्थी वंचित राहणार नाही यासाठी महाज्योती संस्थेने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत. याकरीता महाज्योती, बार्टी, सारथी, तार्ती अशा संस्थांना समानतेने सहकार्य करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी महात्मा फुले, राजश्री शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक क्रांतीच्या इतिहासाचा अभ्यास करावा. या थोर पुरुषांच्या विचारांच्या मार्गाने विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल केल्यास देशाची देखील नक्कीच प्रगती होईल, असेही पालकमंत्री श्री. भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

महाज्योतीच्या विभागीय कार्यालयासाठी सामाजिक न्याय विभाग व जिल्हा प्रशासनाने जागा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे. जेणेकरून महाज्योतीच्या माध्यमातून गोर गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल, असेही पालकमंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महाज्योतीमार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील 122 विद्यार्थ्यांना मोफत टॅबचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात तनुजा भालेराव, नंदिनी वाकारे, गायत्री पुंड, दानीज शेख, सूरज परदेशी, सूरज परदेशी व रोहिणी मिस्त्री या विद्यार्थ्यांना पालकमंत्री श्री. भुजबळ यांच्या हस्ते मोफत टॅबचे वाटप करण्यात आले.

# मृत ज्येष्ठ नागरिकांचे लसीकरण! पालघर ग्रामीण रुग्णालयातील अजब प्रकार

संतोष पाटील

■ पालघर

रेल्वे प्रवास, मॉल प्रवेश तसेच इतर अनेक ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी लसीकरणाच्या दोन मात्रा घेणे बंधनकारक असताना पालघर तालुक्यातील एका मृत महिलेला दुसरा लसीकरणाची मात्रा दिल्याचे संदेश व प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटी उघडकीस आल्या असून एकाच कुटुंबातील तीन व्यक्तीने प्रत्यक्षात लसची दुसरी मात्रा न घेता त्यांचे लसीकरण पूर्ण झाल्याचा दाखला जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

पालघर तालुक्यातील घिवली येथे राहणार हरेश्वर लोखंडे (70), कुंदा लोखंडे (67) तसेच रेणुका लोखंडे (73) यांनी 7 एप्रिल 2021 रोजी टॅप्स रुग्णालयात लसीची पहिली मात्रा घेतली. त्यानंतर कुंदा लोखंडे आजारी होऊन त्यांचा 21 मे रोजी मृत्यू झाला तर हरेश्वर लोखंडे यांना दरम्यानच्या काळात करोना आजाराने ग्रासल्याने त्यांनी लसीची दुसरी मात्रा घेतली नाही. त्याचप्रमाणे त्यांचे नातेवाईक असणाऱ्या रेणुका लोखंडे यांनी देखील तसेच दुसरी मात्रा येऊ शकल्या नव्हत्या.

असे असताना एका मृत ज्येष्ठ महिलेसह अन्य दोघांनी प्रत्यक्षात लसीची दुसरी मात्र घेतले नसताना त्यांना लसीकरण पूर्ण झाल्याचे संदेश (एसएमएस) प्राप्त झाले. त्याच पद्धतीने या तीनही व्यक्तीला लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र जारी करण्यात आले असून पालघर जिल्हा परिषदेमधील लसीकरणात मधील भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

एकीकडे रेल्वे प्रशासन व राज्य प्रशासन वेगवेगळया महत्त्वपूर्ण ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी लसीकरण पूर्ण झाल्याचे दाखला असणे अनिवार्य करण्यात आला असताना अशा पद्धतीने लसीकरण प्रत्यक्षात न करता दिले जाणारे बोगस दाखल्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेमधील त्रुटी उघडकीस आल्या आहेत. विशेष म्हणजे लस साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना देखील काही ठिकाणी लसींच्या शिल्लक राहिलेल्या कुप्याच्या माध्यमातून काही उद्योगात छुप्या पद्धतीने शासकीय लस साठ्यामधून लसीकरण केले जात असल्याचे उघडकीस आले आहे. तसेच काही ठिकाणी दुसऱ्या मात्रेसाठीं नागरिकांमध्ये निरुत्साह असल्याने लसीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी असे प्रकार घडत असल्याचे आरोप होऊ लागले आहेत.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी नियमितपणे लसीकरण सुरू असले तरी लस घेण्यासाठी केंद्रनावरील गर्दी कायम आहे. उद्योगां मध्ये कामाच्या ठिकाणी जाऊन लसीकरण देण्यास काही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी अजूनही सक्रिय असून त्यांच्यावर रोख लावण्यास जिल्हा प्रशासन अपयशी ठरली आहे. मुळातच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या लससाठा व होणारे लसीकरण यांच्या ताळमेळ बसत नसल्याचे अनेक प्रकारावरून दिसून आले असून शासनातर्फे केली जाणारी लसीकरणाची सक्ती खरोखरच परिणाम ठरत आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

याविषयी पालघरचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता सॉफ्टवेअरमध्ये भ्रमणध्वनी क्रमांक अपलोड करताना तांत्रिक चुका झाल्याची शक्यता वर्तवली. संबंधित चुकीच्या झालेल्या नोंद बाबत वरिष्ठ पातळीवर कळविण्यात आले आहे असून झालेल्या चुकीची दुरुस्ती करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# भाजप बेस्ट कामगार संघातर्फे आंदोलन कर्त्या कामगारांना भोजन

■ मुंबई

भाजपा बेस्ट कामगार संघ तर्फे आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या एस टी कामगारांची भोजनाची व्यवस्था काल करण्यात आली . त्यावेळी उपस्थित विरोधी पक्ष नेते प्रवीण भाऊ दरेकर, आमदार गोपीचंद पडळकर व आमदार सदाभाऊ खोत यांनी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा करून कामगारा सोबत सहभोजन केले.



भाजपा बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष गणेश हाके व सरचिटणीस गजानन नागे व उपाध्यक्ष बबनराव बारगजे,आनंद जरग व इतर पदाधिकारी सहभागी होऊन एसटी कामगारांना सक्रिय पाठिंबा जाहीर केला.

ग्रामीण भागातून आलेल्या सर्व एसटी कामगारांना आजाद मैदानावर जेवणाची व्यवस्था करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था पुढाकार घेऊन त्यांना जेवण पुरवित आहेत . याचाच एक भाग म्हणून भाजपा बेस्ट कामगार संघाच्या काही प्रतिनिधींनी लोकवर्गणी गोळा करून सर्व राज्य परिवहन महामंडळाच्या कामगारांना जेवणाची व्यवस्था केली .

यावेळी भाजपा बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष बबनराव बारगजे यांनी एसटी महामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांना आमचा पाठिंबा आहे व यापुढे तुम्हाला जी काही मदत लागेल ती आम्ही करू असे आश्वासन दिले.

# बंदी असलेले प्लास्टिक बाळगल्या प्रकरणी दंड

प्रतिनिधी

■ भाईंदर

मीरा भाईंदर शहरात बंदी असलेले प्लॅस्टिक बाळगणाऱ्या दुकानदारांवर महापालिका उपायुक्त अजित मुठे यांच्या पथकाने धाड टाकून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली.



शनिवारी सकाळी महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे, स्वच्छता निरीक्षक रवि पाटील व त्यांचे कर्मचारी इंद्रलोक परिसरात असतांना एका मोटारसायकल वरून प्लास्टिक कॅरिबॅग घेवून जाताना एकजण आढळला. त्याच्या कडे विचारणा केली असता त्याने तो विविध छोट्या विक्रेत्यांना प्लास्टिक पुरवित असल्याची माहिती दिली.त्याच्याकडील संपूर्ण प्लास्टिक जप्त करून त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.तर दुसऱ्या घटनेत उपायुक्त अजित मुठे व त्यांच्या पथकाने इंद्रलोक परिसरात असलेल्या मेरा मार्ट या मॉलवर कारवाई करुन त्यांच्याकडून प्लास्टिक कॅरिबॅग, प्लास्टिक पेले ताटल्या जप्त केले. संबंधित मॉलच्या मालकावर सुद्धा दंडात्मक कारवाई करण्यात आली.

बऱ्याच वेळा रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांकडे प्लास्टिक पिशव्या असतात मात्र त्यांच्यावर मुकादम व स्वच्छता निरीक्षक यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे दिसून येते. यापुढे अशी कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यावरच महापालिकेकडून कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या स्वच्छता निरीक्षक व मुकादमाच्या कार्यक्षेत्रात प्लास्टिक आढळेल त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात येणार असल्याचे उपायुक्त अजित मुठे यांनी सांगितले.

# संत कक्कया महाराज चौकातील चबुतरा बांधुन देण्यासाठी मनपाला भाजपातर्फे रस्ता रोको आंदोलनाचा ईशारा

■ मुंबई

कुर्ला पश्चिम कमानी येथील संत कक्कया महाराज चौकातील चबुतरा पुन्हा मुंबई महानगरपालिका मार्फत बांधुन देण्यात यावा याकरीता भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा चे मुंबई प्रदेश सचिव गोविंद खरटमोल यांनी समाजातर्फे रस्ता रोको आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे.कुर्ला पश्चिम एल.बी.एस. मार्ग कमानी येथील फिनिक्स मॉल शेजारच्या चौकाला बृहन्मुंबई महानगर पालिकेने संत कक्कया महाराज चौक असे नाव दिले आहे. सुंदरबाग विभागात कक्कया समाज (ढोर) समाज मोठया प्रमाणे राहत असुन या चौकला हे नाव १० ते १२ वर्षे पुर्वी देण्यात आले होते सर्व समाजाने त्यावेळी महापालिकेच्या सहमतीने संत कक्कया महाराज याचा चबुतरा बांधला होता. तो चबुतरा बृहन्मुंबई महानगर पालिका ने ३ वर्षा पूर्वी तेथुन मोठी गटारे बनविण्यासाठी तो चबुतरा तोडण्यात आला त्यावेळी संबंधीत अधिकारी यांना जाब विचारले असता तो चबुतरा चांगला प्रकारे बांधुन देऊ असे सांगण्यात आले होते. समाजातर्फे वारंवार सुचना देऊन सुध्दा संबंधित अधिकारी या चबुतऱ्या बाबत काहीही उत्तर देत नाहीत फक्त हे काम लवकरात लवकर करु हेच गेल्या दोन वर्षा पासुन सांगत आहेत. समाजाची वारंवार तक्रार येथे स्थानिक नगरसेवक हरिष भार्दीगे यांनी सुध्दा मांडली आहे. तरी ही अधिकाऱ्यांनी याबाबत कुठलीच ठोस पाऊल उचलेले नाही. आता याबाबत भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा चे मुंबई प्रदेश सचिव गोविंद खरटमोल यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना पत्राद्वारे मागणी केली आहे की संत कक्कया महाराज चौकाजवळील चबुतरा येणाऱ्या १५ दिवसात बनवून देण्यात यावे. अन्यथा भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा मुंबईच्या वतीने संत कक्कया महाराज चौक, एल.बी.एस. मार्ग, चा रास्ता रोको करण्यात येईल. या मध्ये कोणतीही नुकसान झाल्यावर या बद्दल आमची जबाबदारी नसेल यांची बृहन्मुंबई महापालिकेने नोंद घ्यावी. या संदर्भात याबाबत भारतीयजनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा चे मुंबई प्रदेश सचिव गोविंद खरटमोल यांनी मुंबईच्या महापौर, मनपा एल विभाग सहाय्यक आयुक्त, घाटकोपर पोलीस ठाणे, विनोबा भावे नगर पोलिस ठाणे तसेच नगरसेवक हरीश भार्दीगे आदींना पत्रव्यवहार केला आहे.


**REMSONS Industries Limited**

Where Creation is the Culture

**CIN : L51900MH1971PLC015141**

**नोंदणी. कार्यालय : ४०१, ४ था मजला, ग्लॅडीओला, हनुमान रोड, विले पारले (पूर्व), मुंबई ४०००५७.**

**दूरध्वनी : ०२२-२६२६२१००, २६११२२३६८ ई-मेल : corporate@remsons.com, संकेतस्थळ : www.remsons.com**

**३० सप्टेंबर, २०२१ रोजी तिमाही आणि अर्धवर्ष अखेर अ-लेखापरीक्षीत वित्तिय निष्कर्षांचे सारांश**

रु.लाखात(इपीएस वगळून)

| तपशिल | स्वतंत्र | | | | | | एकत्रीकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाहि अखेर | | | अर्धवर्ष अखेर | | वर्ष अखेर | तिमाहि अखेर | | अर्धवर्ष अखेर | वर्ष अखेर |
| | ३०.०९.२०२१ | ३०.०६.२०२१ | ३०.०९.२०२० | ३०.०९.२०२१ | ३०.०९.२०२० | ३१.०३.२०२१ | ३०.०९.२०२१ | ३०.०६.२०२१ | ३०.०९.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| | (अलेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (लेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (अ-लेखापरीक्षीत) | (अलेखापरीक्षीत) | (लेखापरीक्षीत) |
| प्रचलनामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ६,०९५.११ | ३,६०८.७२ | ५,५१५.१० | ९,७०३.८४ | ६,८३३.१८ | १९,७४२.४८ | ७,५०१.५१ | ५,२३२.९२ | १२,७३४.४३ | २२,८५६.१९ |
| सदर कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि असाधारण बाबी पूर्व) | ६४.११ | (१७७.३२) | १६९.३१ | (११३.२२) | (१३७.८६) | ५५२.५१ | १६८.८५ | (१९२.२९) | (२३.४४) | ४६२.३० |
| सदर कालावधीसाठी कर पूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि असाधारण बाबी पश्चात) | १३८.२३ | (१७७.३२) | १६९.३१ | (३९.१०) | (१३७.८६) | ८८२.१९ | २४२.९७ | (१९२.२९) | ५०.६८ | ७३१.९९ |
| सदर कालावधीसाठी कर पश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि असाधारण बाबी पश्चात) | १०४.६३ | (१४०.५२) | १२२.१४ | (३५.८९) | (१००.५०) | ६६५.५५ | २०६.२७ | (१५५.४९) | ५०.७९ | ४४८.५१ |
| सदर कालावधीसाठी सर्वसमावेशक उत्पन्न (सदर कालावधीसाठी नफा/(तोटा) आणि अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात )) | ९७.७८ | (१३२.६४) | १२२.४१ | (३४.८६) | (१००.९२) | ६६४.९७ | (१८०.१४) | (१०६.०३) | ७४.११ | ४८१.६० |
| समभाग भांडवल (दर्शनि मूल्य रु.१०/- प्रती शेअर) | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ |
| (मागील वर्षासाठी लेखापरीक्षित ताळे-बंद पत्रामध्ये दर्शविल्यानुसार पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) राखीव | ३१ मार्च, २०२१ रोजी अनुसार | | | | | २,५६७.६५ | | | | २,४००.५८ |
| प्रती भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/- चा) (अ) मुलभूत (ब) साम्यीकृत | १.८३ १.८३ | (२.४६) (२.४६) | २.१४ २.१४ | (०.६३) (०.६३) | (१.७६) (१.७६) | ११.६५ ११.६५ | ३.६१ ३.६१ | (२.७२) (२.७२) | ०.८९ ०.८९ | ७.८५ ७.८५ |

**टीप**

१. वित्तीय निष्कर्षांचे लेखा समितीने पुनरावलोकन केले आणि शिफारस केली आणि संचालक मंडळाने त्यांच्या १२ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्य मंजुरी दिली. सदर वित्तीय निष्कर्ष कंपनी (भारतीय लेखा मानक) अधिनियम, २०१३अंतर्गत विहीत अनुसार भारतीय लेखा मानक (इंड एएस) अनुसार, आणि अन्य मान्यताप्राप्त लेखा पध्दती आणि प्रचलनात असलेल्या नितीनुसार तयार करण्यात आले आहेत.

२. सेबी (लिस्टग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स, २०१५ च्या रेग्यूलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या ३० सप्टेंबर, २०२१ रोजी समाप्त तिमाहीच्या अ-लेखापरीक्षित निष्कर्षांच्या तपशीलाचा उपरोक्त हा सारांश आहे. तिमाही आणि वार्षिक निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप कंपनीच्या संकेतस्थ अर्थात www.remsons.com आणि बीएसई लि. अर्थात चे संकेतस्थळ www.bseindia.comn आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे संकेतस्थळ (www.nseindia.com) वर उपलब्ध आहे.

**रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता**
**हस्ता/-**
**क्रिष्णा केजरीवाल, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन - ०००५५८२३**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२१**